# प्रकरण दुसरे

## साहित्य व समाज : परस्पर संबंध

# प्रकरण दुसरे

## साहित्य व समाज : परस्परसंबंध

### १) साहित्य व समाज: पार्श्वभूमी:

साहित्य व समाज यांचा संबंध लक्षात घेतांना इतर गोष्टीही विचारात घेतल्या जातात. समाज एका विशिष्ट अशा सांस्कृतिक स्वरूपातून अथवा चाकोरीतून विकसित झालेला असतो. समाजाच्या या सांस्कृतिक विकासात अनेक घटक कार्यरत झालेले असतात. धर्मसंस्था, न्यायसंस्था, शासनसंस्था यासारख्या अनेक संस्था समाज धारणेचे कार्य करीत असतात. यात जे जे उपयुक्त आहे ते सर्व स्विकारले जाते. त्याज्य असलेले दूर ठेवले जाते अथवा त्यात जर विकृती आढळली तर सामाजिक व्यासपीठांवर त्याबद्दल चर्चा होते.

साहित्य व समाज यांच्या संबंधाचा विचार करतांनाही असेच स्वरूप स्विकारले जाते. साहित्याची सामाजिक उपयुक्तता, सामाजिक मर्यादा अथवा बांधिलकी, समाजाचे यथोचित चित्रण अशा संदर्भात विचार केला जातो. साहित्य व समाज यांचे असे स्वरूप विचारात घेतांना ते अत्यंत संकुचित व वरवरच्या स्वरूपात मांडले जातात असे स्पष्ट मत डॉ. सं.गं. मालशे [१] यांनी मांडलेले आहे. त्यात ते पुढे म्हणतात, "एखाद्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचा किंवा विशिष्ट आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रणालींचा निर्देश करून त्यांचे व साहित्याचे संबंध काय असे प्रश्न विचारले जात असतात. साहित्यावर समाजाचा नेमका कोणता परिणाम घडून येतो, याचे वर्णन आणि व्याख्या करण्याचे प्रयत्न होत असतात, तसेच समाजातील साहित्याचे स्थान काय, या गोष्टीचे वर्णन व परीक्षण करण्याचेही प्रयत्न होत असतात." अशा विविध स्वरूपातून हा संबंध तपासला जातो.

समाज व साहित्य यांचे स्वरूप लक्षात घेताना "साहित्य म्हणजे समाजाचे अथवा जीवनाचे प्रतिबिंब असलेला आरसा" असेही विधान केले जाते. वास्तवतेचे

चित्रण करण्याच्या हेतुनेच ललित साहित्याची निर्मिती होते.[२] साहित्य कलेचा विचार करताना त्यातून येणाऱ्या आशयाबद्दल अनेक वेळा वाद निर्माण होतात. लेखक हा एक कलावंत असतो व तो त्याच्या अनुभूती-प्रमाणे, जाणिवेप्रमाणे लेखन करत असतो. तो समाजशास्त्राची मांडणी करीत नसतो तर तो प्रथमत: कलात्मक सौंदर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. तशी कलाकृती साधताना नकळत त्यातून जीवनदर्शन समाजचित्रण येत असते. टीकाकार मात्र अनेकवेळा अशा एखाद्या दृष्टीकोनातून त्याचा विचार करतात व त्यातून नवे प्रश्न निर्माण होतात.

साहित्यकृतीतून आलेले समाजचित्रण हे सहजतेने अथवा नकळत येत असते. लेखक अथवा कवी जाणून बुजून त्याची निर्मिती करीत नसतो. विशेष म्हणजे असे, सहजतेने अथवा नकळत आलेले चित्रणच अधिक प्रभावी असते. जाणून बुजून अथवा हेतुत: जेव्हा असे रेखाटन करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा त्यात सहजतेऐवजी कृत्रिमता येत असते. म्हणून कोणताही कलावंत अथवा लेखक स्वत: अशा कृत्रिमतेच्या जाणीवेने लेखन करावयास प्रवृत्त होत असेल असे म्हणता येणार नाही. मग येथे प्रश्न निर्माण होतो तो असा की साहित्य-कृतीतून सामाजिकतेचे चित्रण येतेच कसे ? त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे लेखक हाही समाजातच राहत असतो. सामाजिक वास्तवातून लेखकाचे अस्तित्व आपणास बाजूला काढता येत नाही. साहजिकच लेखक अथवा साहित्यकृती निर्माण करणारा कलावंत ज्या सामाजिक परिस्थितीत राहतो त्याचा परिणाम त्याच्यावर त्याच्या लेखन प्रक्रियेवर झालेला असतो. त्यामुळे साहित्यकृतीतून समाज जीवनाचा ठसा नकळतपणे उमटलेला असतो.

साहित्याचे अभ्यासक मात्र याबाबत विशिष्ट भूमिका स्विकारतात. जेव्हा एखादी भूमिका स्विकारली जाते तेव्हा आपोआपच त्याच दृष्टीने

कलाकृतीकडे पाहिले जाते. त्याच स्वरूपातून विचार केला जातो. अशा स्वरूपातून विचार करणाऱ्यांवर हल्ला चढवितांना "गंगाधर गाडगीळ"[3] म्हणतात, "साहित्याच्या स्वरूपाविषयीच्या अज्ञानामुळे आपल्याकडे साहित्यिकांकडून भलत्याच अपेक्षा केल्या जातात. समाज-सुधारक, क्रांतिकारक, तत्त्वज्ञ आणि शास्त्रज्ञ या सर्वांचे कार्य त्याने केले पाहिजे असा आग्रह धरला जातो."

गाडगीळांचे हे मत कलात्मक स्वरूपाच्या आविष्काराच्या भूमिकेतूनच आलेले आहे. कलेचा विचार करतांना अशी कलात्मक दृष्टी असणे आवश्यक आहे. पण जर कलावंताकडून समाजसापेक्ष चित्रण येत असेल तर त्याचाही विचार होणे गरजेचे असते. कलावंताच्या समाजसापेक्षतेतून अथवा या बाजूने विचार करून एच.ए. तेन.[४] या अभ्यासकाने याबाबत पुढील विचार मांडले. "कोणतीही साहित्यकृती घेतली तरी, ती केवळ कल्पनांचा खेळ, किंवा उद्दिपित मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो त्या समाजाचा, त्याच्या देशाचा, त्या देशाचा इतिहास-भूगोल, संस्कृतिचा, तो लेखक ज्या काळात जगला त्या काळातील युगधर्माचा एक समयावच्छेदेकरून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो"तेनच्या या विचारात साहित्यामागच्या सामाजिकतेची पार्श्वभूमी अचूकतेने येते. याबाबतीत त्याने पुढील तीन प्रभावी घटक कारणीभूत होतात. असे म्हटले आहे. ते घटक म्हणजे Race , Milieu आणि Moment या संकल्पनेत साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व व तो ज्या मानवसमूहात जन्मला-वाढला, त्या मानव समूहाची व्यवच्छेदक लक्षणे अंतर्भूत होतात. व्यक्ती ज्या प्रदेशात राहते त्या प्रदेशाची भौगोलिक, ऐतिहासिक प्रवृत्ती, प्रकृती, संस्कृती इत्यादींच्या वैशिष्ट्यांनी त्या व्यक्तीची अस्मिता नियत होते. तर दुसरी संकल्पना Milieu ची आहे. तीत साहित्यिक ज्या काळात वावरला त्या काळातील एकूण परिस्थिती अभिप्रेत आहे.

तर तिसरी Moment ची उपपत्ती अथवा संकल्पना याचा संदर्भ विशिष्ट युगप्रवृत्तीशी असतो. अशा प्रकारे Race, Milieu व Moment असा तेनचा "त्रिमिती" सिध्दान्त आहे. कोणत्याही साहित्य कृतीचे किंवा कलाकृतीचे सम्यक मूल्यमापन वरील सर्व घटकांचा संकलित परिणाम ध्यानात घेऊनच करणे अधिक अन्वर्थक होईल असा त्याचा मतितार्थ आहे.

तेनने अत्यंत बारकाईने साहित्य कलाकृतीमागील सामाजिकतेची पार्श्वभूमी येथे स्पष्ट केलेली दिसते. सामाजिकतेचा विचार करताना केवळ सामाजिक वास्तव अथवा वर्तमानकालीन वास्तव लक्षात घेऊन चालणार नाही तर तेन ने वर सांगितलेल्या सर्व बाजूंचाही विचार लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. विशेषत: प्राचीन साहित्याचा व त्यातही सामाजिकतेचा विचार करताना या विचाराला महत्त्व येते. तेनच्या विचारातील अपुरेपणा स्पष्ट करताना कुलकर्णी गो.म.[५] म्हणतात, की आजच्या आर्थिक, मानसशास्त्रीय स्वरूपात हा विचार एकांगी व तोकडा वाटतो. तसेच साहित्यिका-साहित्यिकांतील गुणा गुणात्मक भेद त्याने लक्षात घेतला नाही. असे असले तरी तेनच्या विचारातील मौलिकता आपणांस नाकारता येत नाही.

२) <u>निर्माण झालेले निरनिराळे वाद:</u>

समाजाचा साहित्य निर्मितीवर जसा परिणाम होतो तसाच साहित्य-कृतीचा अथवा निर्माण झालेल्या वाङ्मयाचाही परिणाम समाजावर होतो. हा परिणाम अनेक वेळा व्यापक स्वरूपाचा असतो. त्यातून कधी कधी अनेक नवे प्रश्नही निर्माण होतात. नवेनवे वाद त्यातूनच पुढे आलेले दिसतात. स्वच्छंदतावाद, वास्तववाद असे तात्त्विक स्वरूपाचे वादतर निर्माण होतातच पण त्याबरोबर जीवनवाद, कलावाद, नीतिवाद असे विविध स्वरूपाचे वादही निर्माण झालेले दिसतात. मराठी साहित्यात "कलेसाठी कला" व "जीवनासाठी कला" हा वाद सर्वश्रुत आहे. साहित्याकडे एखाद्या विशिष्ट

दृष्टीकोनातून जेव्हा पाहिले जाते तेव्हा अशा स्वरूपाचे वाद निर्माण झालेले आढळतात.

कधी कधी धर्म भावनेबद्दल केलेले लिखाण असे वाद उपस्थित करण्यास कारणीभूत होतात. उदा. सलमान रश्दी यांच्या "सटॅनिक व्हर्सेस" या पुस्तकामुळे वादळ निर्माण झाले. आपल्याकडेही डॉ. रावसाहेब कसबे यांच्या "झोत" पुस्तकामुळे असे वादंग निर्माण झाले होते. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "रिडल्समुळे" ही समाजात खळबळ पसरली होती. धार्मिक स्वरूपाप्रमाणे कधी कधी व्यक्तिवाचक लिखाणातून वाद निर्माण होतात. बाळ गांगल[६] यांनी ज्योतिबा फुले यांच्याबद्दल सोबतमध्ये आक्षेपार्ह लेखन केल्याने सर्वत्रच त्याविरूद्ध आवाज उठविला गेला. वैचारिक लेखनाप्रमाणे कलात्मक लेखन स्वरूपामुळेही समाजात चळवळी निर्माण होतात. उदा. विजय तेंडूलकरांचे घाशीराम कोतवाल, सखाराम बाईंडर, गिधाडे या नाटयकृतीमुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली होती. अशा विविध स्वरूपातून समाजावर होणाऱ्या साहित्याच्या परिणामांचे दर्शन आपणास घडून येते. चांगल्या साहित्यकृतींचा प्रश्न निर्माण होत नाही. पण साहित्यातून जेव्हा परिवर्तनवादी विचार मांडले जातात. वाकोरीविरूद्ध जेव्हा लेखन केले जाते तेव्हा मात्र नेहमीच "वाद" उपस्थित होतात. प्लेटो[७] सारखे आदर्शवादी विचारवंत मग साहित्याला विशिष्ट स्वरूपातच पाहू लागतात व साहित्याने आदर्श विश्वबंधुता या सारख्या गुणांची जोपासना करावी असे मत व्यक्त करु लागतात. चांगल्या साहित्याबद्दल मत मांडतांना प्लेटो म्हणतो की, "विवेक किंवा ज्ञान, शौर्य, संयम व न्याय हे आदर्श राज्यातील नागरिकांचे चार सद्गुण होत. ज्या प्रमाणात कला या सद्गुणांचा परिपोष करते त्या प्रमाणात ती चांगली ठरते." साहित्य-कलेकडेदेखिल अशाच आदर्शवादी विचारातून पाहिले जाते. त्याबाबत तत्त्वरूपी विचार आविष्काराच्या संबंधात मांडले जातात. चांगली कला

अथवा चांगले साहित्य कोणते हे ठरविणे तसे अवघड असते, पण त्याकडे एका विशिष्ट विचारातून अथवा दृष्टीकोनातून पाहिल्यावर मात्र याबाबत मर्यादा पडतात.

३) अस्तित्त्ववादी दृष्टीकोन:

साहित्यात कल्पनाजन्य चित्रणाला महत्व असते किंबहुना ते त्याचे एक महत्त्वपूर्ण अंग आहे. परंतु हे चित्रण जेव्हा अतिशयोक्त स्वरूपातून रंगविले जाते, तेव्हा त्यात कल्पकता न रहाता केवळ स्वप्नरंजकता निर्माण होते. स्वच्छंदतावादी लेखन प्रवृत्ती ही केवळ अशा स्वरूपातून रंगलेली दिसते. स्वप्नील लेखनात केवळ दिखाऊपणा व इतर गोष्टीचाच भरणा अधिक असतो. अशा साहित्याच्या विरोधातून वास्तववादी साहित्याची निर्मिती झालेली आढळते.

वास्तववादी साहित्यातून समोर घडणा-या घटनांच्या यथातथ्य चित्रणाला महत्व असते. किंबहुना वास्तववादी लेखनाचे ते एक महत्त्वाचे वैशिष्टय मानावे लागेल. आधुनिक वास्तववादाचा प्रणेता बॅलझॅक यांच्या लिखाणाचा दाखला देऊन डॉ. रा.शं. वाळिंबे यांनी त्याचे महत्त्व सिध्द केले. बॅलझॅकच्या लिखाणात संपूर्ण यथार्थ स्वरूप असते असे सांगून वाळिंबे म्हणतात, की "अगदी सामान्य जीवनातील रोजच्या व्यवहारातील पराकाष्टेच्या साध्या व काव्यहीन जीवनात बॅलझॅक रंगून जातो." पात्रांच्या स्वभावाचे मार्मिकज्ञान, बारीकसारीक तपशीलाचे उत्कृष्ठ वर्णन आणि सत्याचा किंचितही अपलाप न करिता व्यक्तींचे व घटनांचे यथातथ्य चित्रण काढणे. अशा विविध स्वरूपाच्या बारकाव्यांना वास्तववादी लेखनात महत्त्व प्राप्त होते. वास्तववादी चित्रणामुळे कल्पनाजन्यता, शाब्दिक अवडंबर यासारख्या गोष्टी आपोआपच बाजूला पडतात. पण त्याच बरोबर वास्तववादी चित्रणाच्या नावाखाली काहीसे बीभत्स स्वरूपाचे लेखन

होतानाही आढळते. त्यात ग्राम्यता व असभ्यता असेच स्वरूप जास्त दिसते. डॉ. वाळिंबे[९] यांनी याचे विश्लेषण केले आहे. अनेकवेळा वास्तवतेचे नाव घेऊन त्याअनुरोधाने बीभत्स अथवा ओंगळपणे चित्रण झालेले आढळते. ते किती समाजसापेक्ष अथवा यथार्थ असते हा एक महत्त्वाचाच भाग आहे. साहित्यातील वास्तवता हे एक महत्त्वाचे मूल्य म्हणून स्विकारले गेले आहे. असे वास्तवतेबद्दलचे विचार गंगाधर गाडगीळांनी[१०] व्यक्त केले आहेत. पण अभ्यासपूर्वक परामर्श घेतला तर हे मूल्य अत्यंत सदोष असे आढळून येईल. असेही त्यांनी लगेचच स्पष्ट केले. वास्तवतेच्या अशा स्वरूपामुळेच की काय पुढे अस्तित्त्ववादाची निर्मिती झालेली आढळते.

अस्तित्ववादाचे स्वरूप हे जितके गूढमय, नकारात्मक तितकेच ते समाजाधिष्ठितही आहे. कारण या प्रवृत्तीचा महत्त्वाचा भाग म्हणजे आहे ते सर्व नकारात्मक अथवा निषेधात्मक स्वरूपातून पाहणे. जीवनाची अर्थहीनता, रूढ नीतिकल्पनांचा तिरस्कार अशी विविध स्वरूपे अस्तित्त्ववादात आढळतात. साहजिकच विशिष्ट अशा चाकोरीबध्द पणे जाणाऱ्या समाजाला हे धक्कादायक वाटते. त्यामुळेच अस्तित्त्ववादी लेखनामुळे कलाक्षेत्रात जरी हाळबळ माजली नाही तरी सामाजिक क्षेत्रात मात्र त्याचे पडसाद जोरदारपणे वाजतात.

अस्तित्त्ववादाचे वेगळेपणे स्पष्ट करतांना कुलकर्णी[११] गो.म. यांनी माणसाच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेला महत्त्व दिले आहे. माणसाचे माणूस म्हणून असलेले स्वातंत्र्य टिकेल तरच त्याने आपले जीवन यथार्थपणे घडविले असे म्हणता येईल. यासाठीच अस्तित्त्ववाद विज्ञानाचा व पारंपारिक धर्मकल्पनांचा संदर्भ नाकारतो. "व्यवस्थे"चा निषेध करून अस्मितेची निरपवाद स्थापना करणे ही अस्तित्त्ववादाची प्रतिज्ञा आहे." अस्तित्त्ववादाच्या साहित्यातील सर्वच चित्रणावर वेगळा परिणाम झालेला जाणवतो. संदर्भहीन, मूल्यनिरपेक्ष, निळेकाळे उत्थान आणि भीषण जीवनाचे आणि सामाजिकतेचेही

त्यातून व्यक्त होऊ लागले. मानवी जीवनातील भय व मरणाविषयीच्या संदर्भांनाही वेगळे स्वरूप त्यातून प्राप्त झाले. साहित्याच्या व्यापकतेला त्यामुळे भरीवपणा येण्यास मदत झाली.

४) मार्क्सवादी दृष्टीकोन:

गतशतकात किंवा १९व्या शतकात मानवी जीवनाच्या आणि समाजाच्या सर्वांगावर स्वत:च्या विचाराची छाप पाडणारा दृष्टीकोन अथवा तत्त्वप्रणाली म्हणून मार्क्सवादाकडे पहावे लागते. त्याचे श्रेष्ठत्व लक्षात घेऊनच डॉ. रा.भा. पाटणकर[१२] त्याबद्दल म्हणतात की, "मार्क्सवाद हे विश्वाविषयीचे एक संपूर्ण व सर्वंकष असे तत्त्वज्ञान आहे. मानवी ज्ञानाचा आणि जीवनाचा असा एकही प्रांत नाही की ज्याला मार्क्सवादाने स्पर्श केलेला नाही." साहजिकच कलेचे व साहित्याचे अथवा वाङ्मयाचे क्षेत्रही या विचारापासून अलिप्त राहिले नाही.

मार्क्सवादी विचारवंतानी साहित्याचा विचार करताना सामाजिकतेला महत्त्व दिलेले आहे. एखादा लेखक कोणत्या वृत्तीने लिहीतो व तो तसे लिखाण करण्यास का प्रवृत्त होतो. याचेही विवेचन त्यांनी केले असल्याचे आढळते. उदा. साहित्यनिर्मिती आणि साहित्य विकास यांची समाज सापेक्षता लेनिनने आपल्या विवेचनात प्रतिपादिली. टॉलस्टॉयच्या वाङ्मयकृतीचे त्याने विस्ताराने परीक्षण केले. त्यात समाजाच्या समाजसापक्षेतेवर भर दिला. टॉलस्टॉयच्या उत्तमोत्तम साहित्यकृतीत तत्कालीन समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब पडते. हा मुद्दा लेनिनने पुन: पुन्हा मांडला."[१३] अशा समाजसापेक्षतून मार्क्सवादी विचारवंत साहित्याची समीक्षा करताना आढळतात. स्वत: मार्क्स, एंगल्स यांनीही याच स्वरूपातून कलाकृतीकडे पाहिले आहे. "साहित्याच्या स्वरूपामध्ये होणारे विविध प्रकारचे बदल हे समाजामध्ये होणाऱ्या बदलानुक्रमाने होतात ही त्यांची मुख्य भूमिका." तसेच साहित्याच्या अथवा समीक्षणाच्या इतर मूल्यांना मान्यता न देता सामाजिक मूल्येच त्यांनी आधारभूत मानली. कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना

समाजचित्रणाबाबत ती कितपत इमानदार आहे. याला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले.[१४] मार्क्सवादी विचारवंत यातूनच सामाजिक परिवर्तनाची जाणीव ठेवतात. इतकेच काय पण त्याहीपुढे जाऊन समाज परिवर्तनाचे अथवा सामाजिक क्रांतीचे साधन म्हणूनही साहित्याचा ते वापर करतात. वास्तव जीवनाचे चित्रण करून समाज जागृती करणे, सामाजिक स्वरूपाचे प्रश्न विशेषत: जे आर्थिक विषमतेमुळे निर्माण झालेले असतील अशा प्रश्नांना वाचा फोडणे. अशा विविध पातळीवरून व त्यातही सामाजिक पार्श्वभूमीतून हे विचारवंत साहित्यिक कलाकृतीकडे पाहतात. आर्थिक विषमता, सामाजिक समता, भांडवलवादी स्वरूपे अशी सर्व आर्थिक स्वरूपावरची जाणीव ठेवून साहित्याचे अवलोकन केले जाते. मार्क्सवादी विचारसरणीमुळे विषमतेमुळे बाजूला पडलेला वर्ग जागृत झाला. किंवा स्वत:च्या वेदना तो अधिक उठावदारपणे शब्दातून मांडू लागला. मराठीतील विद्रोही साहित्य म्हणून पुढे आलेले दलितांचे साहित्य अशा जाणिवांतूनच पुढे आलेले आपणांस आढळून येते. तरीपण साहित्यासारख्या कलात्मक स्वरूपाचा विचार करताना आर्थिकतेच्या एकाच एका मूल्यांवरून अभ्यास अथवा पाहणे हे काहीसे मर्यादितच ठरते. त्यामुळेच डॉ. पाटणकर[१५] या प्रणालीबाबत आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, "मार्क्सवादी स्पष्टीकरण जरी बरोबर असले तरी ते पुरेसे ठरत नाही. प्रत्येक गोष्टीला आर्थिक बाजू असतेच असे नाही. पुष्कळवेळा आर्थिक बाजू इतक्याच इतर बाजूही महत्त्वाच्या असतात." सारांश अशा विविध विचारांतून मार्क्सवादी विचारसरणीची व समीक्षेची मर्यादाही स्पष्ट केलेली आढळून येते.

५) साहित्य व सत्य:

लेखक लेखन जे करतो ते स्वत:च्या प्रतिभा बळावर. अनेकवेळा त्यात काल्पनिकता वा कल्पनेचा स्वैर विलास झालेला असतो. त्यामुळे त्याने जी वर्णने रेखाटलेली असतात ती खरी किती ? व खोटी अथवा केवळ काल्पनिक

स्वरूपाची किती ? असा प्रश्न निर्माण होतो. कलाकृतीत आलेली पात्रे, त्यांचे विचार, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन या सर्व बाबतीत असा प्रश्न निर्माण होतो. तसेच एखादा कलावंत जेव्हा वस्तुस्थितीचे यथार्थ दर्शन घडविण्याचा दावा करतो तेव्हाही त्याच्या लेखनातील त्या स्वरूपाबद्दल प्रश्न निर्माण होतोच. वर जे वास्तववादी आणि अस्तित्त्ववादी लिखाणाचे विश्लेषण केले आहे. त्याबाबतही असे प्रश्न निर्माण होतातच.

प्रत्यक्षातील सामाजिक जीवन, व्यक्ती व साहित्यातील समाज जीवन व व्यक्ती या एकसारख्या असतात का ? साहित्यिक कलाकृतीमुळे वाद निर्माण होतो तो अशा स्वरूपामुळे. घाशीराम कोतवाल, गिधाडे या नाटकांमुळे वादळे उठली ती त्यातील चित्रणांमुळे. अनेक लेखक वास्तव सत्त्यापेक्षा काल्पनिक सत्त्याचे चित्रण करतात. साहित्य कलाकृतीतील सत्त्याअसत्याचा विचार करताना वास्तव सत्य व भाव सत्य यातील फरक लक्षात घेणे महत्त्वाचे असते. वास्तव सत्य हे प्रत्यक्ष जीवनातील अनुभूतीतून आणि सामाजिक स्वरूपाच्या वास्तवातून निर्माण झालेले असते. त्याला पर्याय देता येत नाही. भाव सत्य मात्र लेखकाच्या कल्पनेच्या विश्वातून निर्माण झालेले असते. उदा. खानोलकरांच्या "रात्र काळी घागर काळी" मधील "लक्ष्मी" ही पूर्णपणे कल्पनेच्याच पातळीवरची आहे. वास्तवात अशी गोरीपान स्त्री असे वागत असेलच असे नाही.

अनेकवेळा लेखकाने लिहीले ते खरे आहे का ? असाही प्रश्न उपस्थित होतो. विशेषत: जेव्हा वैचारिक स्वरूपाची विधाने लेखक करतो तेव्हा त्याच्या खरेपणाबद्दल प्रश्न उपस्थित होतो. उदा. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या "रिडल्समध्ये" राम-कृष्णाबद्दल जी विधाने केली त्यामुळे जो वाद उपस्थित झाला तो अशाच स्वरूपामुळे.

अनेकवेळा लेखकाचे लेखन हे विशिष्ट अशा अनुभूतीतून निर्माण झालेले असते. समाजसापेक्षता अथवा जीवनसापेक्षता तेथे असतेच असे नव्हे. लेखकाच्या अशा लेखन स्वरूपाबद्दल जोशी वा.म.[१६] म्हणतात की, "रूढ कल्पना, नीतिनियमांना, चालीरीतींना धक्का देणारे वर्णन कितीही चांगले असले तरी, किंबहुना ते चांगले असते म्हणून वाद निघतो. असले लिखाण योग्य कि अयोग्य ?" अशा स्वरूपातूनच साहित्याच्या नैतिकतेबद्दलही वाद उपस्थित होतो. साहित्य कलेचा संबंध हा मानवी जीवनाशी व मानव निर्मित समाजाशी असल्याने साहित्यिकाने लेखन करताना जे नैतिक अनैतिकतेचे स्वरूप स्विकारलेले असते त्याचीही चर्चा गांभियाने होत असते.

## ६) साहित्य व नीती:

सामाजिक जडण-घडणीशी लेखकाचा व त्याने निर्माण केलेल्या साहित्यकृतीचा संबंध खूप निकटचा असतो. लेखकाची भाषा ही अनेकवेळा सामाजिक आचार-विचाराला वळण लावणारी असते. त्याचे भाषिक अविष्कार अनेकवेळा समाज जीवनावर खोल ठसा उमटवणारे असतात. म्हणून साहित्यातून येणारी वर्णने,भाषिक अविष्कार, शब्द यांच्याकडे खूप बारकाईने पाहिले जाते. लेखकाच्या या स्वरूपावर जसे लक्ष ठेवलेले असते तसेच त्याने चित्रित केलेल्या सामाजिक व जीवनविषयक अविष्काराकडेही पाहिले जाते. कारण कोणताही समाज हा संस्कृतिनिष्ठ असतो, जीवन जगण्याचे, समाजात वागण्याचे, काही विशिष्ट नियम अशा सांस्कृतिक स्वरूपातून निर्माण झालेले असतात. संस्कृतीचे संस्कार अधिक गडद व पक्के असतात. सामाजिक संस्कृतीचे नियमन पाळणे हे समाजात राहणा-या प्रत्येक व्यक्तीला बंधनकारक असते. सर्वसामान्यांनी सामाजिक नियम नीतिमत्ता जोपासायची व उच्चपदस्थांनी स्वत:च्या मनात येईल तसे वर्तन करायचे हे कोणताही सुसंस्कृत समाज खपवून घेत नाही आणि म्हणूनच कलात्मक चित्रणातून आलेल्या अशा स्वरूपाबाबत सूक्ष्मतेने पाहिले जाते.

साहित्याच्या संदर्भात नैतिकतेचा प्रश्न उपस्थित होतो. तो मानवी जीवनाच्या संदर्भात, साहित्याने नैतिकतेची उपासना करावी. समाजापुढे व त्यातील व्यक्तींपुढे चांगले आदर्श विचार ठेवावे असे म्हटले जाते. जीवनातील सुंदर उत्कट चांगल्या वाटणा-या गोष्टींचे त्याने चित्रण करावे. असेही याबाबत स्पष्ट केले जाते. टॉलस्टॉय[१७] प्लेटो हे विचारवंत अशा आदर्शवादी प्रवृत्तीचे भोक्तेच होते. साहित्याकडून जेव्हा चांगलेपणाची अपेक्षा केली जाते तेव्हा अर्थातच त्यातील विकृत स्वरूपाच्या चित्रणाबद्दल आक्षेप घेतले जातात. साहित्याने अथवा लेखकाने ओंगळवाणे, विकृतीपूर्ण, अश्लील स्वरूपाचे लेखन करू नये असे विचार मांडले जातात. एका दृष्टीने ते योग्यही ठरतील पण शेवटी कलात्मक दृष्टीने विचार करतांना त्यातील कलात्मक मूल्ये पहायची की नाहीत ? समाजात असे घडते तसे चित्रण जर एखाद्या लेखकाने केले तर त्यात वावगे काय ? उदा. म्हणून "वासूनाका" घेता येईल. लेखक भाऊ पाध्ये यांनी या कादंबरीतून मुंबईतील एका नाक्यावरील जमणा-या तरूणांचे जीवन रेखाटले आहे. ऐन पौगंडा-अवस्थेतील ही तरूण मुले वागतात कशी, बोलतात कशी याचे अगदी बारकाईने चित्रण त्यात केले. पण या कादंबरीमुळे समाजात खळबळ उडाली, चर्चा झाली. अलीकडच्या काळात हिट-हॉट नाटकांच्या स्वरूपामुळेही अशीच वादळे उठतात. साहित्यातून येणारे असे अश्लिलतेची, लैंगिकतेची वर्णने नीतीहीन म्हणून ओळखली जातात. अनेकवेळा अशा साहित्यावर व लेखकांवर त्यामुळे नको ते प्रसंगही ओढवतात.

नैतिकतेच्या या स्वरूपाचा विचार करतांना आजचे अस्तित्त्ववादी लेखनही समोर ठेवावे लागते. अस्तित्त्ववादाच्या नकारात्मक स्वरूपामुळे रूढ - सामाजिक आचार - विचारांना धक्का बसतो. पण बदलत्या समाज जीवनाचा विचार करतांना त्यातील यथार्थताही नाकारता येत नाही. तसेच

तसेच नैतिक मूल्यांचे निकष साहित्यकृतीला किती मर्यादेपर्यंत लावावयाचे ? असा प्रश्न निर्माण होतो. खरे साहित्याने नैतिकतेची शिकवण दिल्याने त्याचे संस्कार केल्याने समाज त्यानुसार बदलेल असे म्हणता येत नाही. मात्र एवढे नक्कीच म्हणता येईल की, वासना चाळवणारे, साहित्य हे घातक असते. त्याचे अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा वाङ्‌मया-बद्दल मात्र आवाज उठविणे अथवा त्यावर टीका करणे संयुक्तिकच ठरते. कारण कलात्मक चित्रणाच्या नावाखाली कोणी कितीही उघडे-नागडे स्वरूप रंगवून लागले तर ते किती मर्यादेपर्यंत स्विकारायचे ? हा प्रश्न पुन्हा उरतोच.

## ७) साहित्य आणि प्रचार:

लेखनाचे उद्देश वेगवेगळे असतात. प्रचार करणे त्यातही विशिष्ट संप्रदायाचा अथवा मतप्रणालीचा प्रचार करणे असा एक साहित्याचा हेतु असतो. आजच्या समाज जीवनात, राजकीय, वैचारिक अशा विविध पातळ्यांवरून लेखन होताना आढळते. अशा स्वरूपातूनच प्रचारकी वाङ्‌मय पुढे येते. विशेषत: एखादी चळवळ व तिचा पुरस्कार करणारे साहित्य अशा स्वरूपातून उत्तीर्ण होते. आज मराठीत दलित साहित्य हे अशाच स्वरूपातून पुढे आले. अनेकवेळा प्रचारकी साहित्याला स्वरूपाचे वळण लागलेले दिसते.

अनेकवेळा समाज जागृती करण्याचे कार्य साहित्याला करावे लागते. असे कार्य करताना वाङ्‌मयात प्रचारकी मूल्यांची वाढच होते. स्त्री-मुक्तीचा प्रचार समाजात करणारे साहित्य हे काही अंशी असे प्रचारकी स्वरूपाचे वाटते. स्त्री जागृती हे उद्दिष्ट समोर असल्याने या लेखनात प्रचारावर भर देण्यात येतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

कम्युनिष्ट विचार प्रणालीचे पुरस्कर्ते तर साहित्य हे प्रचाराचे साधन मानतात. "प्रचारात्मक[१८] साहित्याचा पुरस्कार करणारे पुष्कळ लेखक हे साहित्याचे खरे भोक्ते आहेत. त्यांचे मत नीट समजून घेतले तर त्यांच्या मनात आणि पारंपारिक मतांत पुष्कळच साम्य आढळते. केवळ प्रचारासाठी लिहिलेले वाङ्‌मय कला दृष्टया निकृष्ट व फारसे परिणामकारी होणार नाही. कलाकाराने स्वत:च्या सद्सद्विवेक बुध्दीला स्मरून जर लिहिले नाही तर त्याचे लेखन इष्ट तो परिणाम करणार नाही." ही मतेही कम्युनिष्टांचीच आहे. तरी पण त्यांच्या मते साहित्य हे मुख्यत: समाज प्रबोधनाचे, राजकीय सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून वापरावे. अशा विचारांतून कम्युनिष्ट लेखकांनी प्रचारकी वाङ्‌मयाबद्दल मते मांडली आहेत.

प्रचारकी वाङ्‌मयामुळे अनेकवेळा समाजात अराजकता निर्माण होण्याचीही शक्यता असते. कारण प्रचार करताना अनेकवेळा तो मुक्तपणे व स्वैर स्वरूपात केला जातो. त्यामुळे अशा लेखनात भडकपणो भावना भडकविणारे लेखन होत असते. सामाजिक स्वास्थ व शांतता त्यामुळे बिघडण्याची शक्यताही असते. अनेकवेळा अशा साहित्यावर त्यामुळे बंधने घालावी लागतात. साहित्य निर्मितीवर बंधने घातल्याने पुन: सामाजिक बांधिलकीचा प्रश्न उपस्थित होतो. तसेच लेखन स्वातंत्र्याचाही विचार या संदर्भात करावा लागतो.

## ८) सामाजिक बांधिलकी:

प्रचारात्मक लेखन अनेक वेळा समाजविघातक असते. त्यामुळे अशा लेखनाबाबत सामाजिक बांधिलकीचा प्रश्न निर्माण होतो. ही बांधिलकी साहित्यातील, राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वरूपाशी, नैतिकतेच्या दृष्टीकोनाशी संबंधित असते. बांधिलकीचा हा विचार दुसऱ्या महायुध्दाच्या सुमारास अधिक लोकप्रिय झाला. लेखकावर सामाजिक जबाबदारी असते.

त्याने लेखन करतांना आपली ही जबाबदारी लक्षात घेऊनच लेखन करावे. पण अनेकवेळा तसे घडत नाही. कधी भावनेच्या आवेगात, कधी प्रचारकी स्वरूपाच्या लेखनामुळे सामाजिक रूढी नियम, अथवा जीवनसंकेत पाळले जात नाही. त्यामुळे समाजात खळबळ माजते. त्यातून असा बांधिलकीचा प्रश्न निर्माण होतो.

चांगले आणि वाईट आणि श्लील व अश्लील अशा स्वरूपातून हा प्रश्न निर्माण होतो. साहित्यिकाने लेखन करतांना, धार्मिक, नैतिक गुणांची कदर करून व चांगलेपणाच्या स्वरूपातून लेखन करावे. अनेकवेळा लेखक अशा वृत्तीने लेखन करतात. शासनाची सामाजिक परंपरांना, संस्कारांना धक्का लागणार नाही याची त्याने जाणीव ठेवावी अशी अपेक्षा असते. बांधिलकीच्या या स्वरूपातून लेख[redacted] लेखन स्वातंत्र्याचा प्रश्न नंतर उपस्थित होतो. लेखन करतांना लेखक स्वत:च्या वृत्तीप्रवृत्तीनुसार लेखन करतो. अनेकवेळा त्यामुळे त्याचे लेखन हे त्याच्या व्यक्तीगत अनुभूतीतून निर्माण झालेले असते. तरीपण आदर्शवादी अथवा नीतिवादी लोक त्याने कशाप्रकारे लेखन करावे अथवा करू नये याचे नियमच तयार करतात. साहजिकच कलेच्या स्वातंत्र्याचा विचार यातून निर्माण होतो.

१) कला व स्वातंत्र्य:

कलेची निर्मिती ही अनेकवेळा मुक्त अवस्थेत होत असते. कलावंताला विशिष्ट स्वरूपाच्या मर्यादा घालून दिल्यावर उत्कट अथवा अचूक स्वरूपाची निर्मिती होईलच असे नाही. साहित्य कलेच्या बाबतीतही हा विचार उपस्थित होतो. लेखकाने काय लिहावे आणि काय लिहू नये हा सर्वस्वी त्याचा भाग असतो. जेव्हा लेखकावर बंधने घातली जातात. निर्बंध लादले जातात, तेव्हा त्या लिखाणात कृत्रिमता तरी येते किंवा त्याचे लेखन मर्यादित स्वरूपाचे तरी बनते.

त्यामुळे त्याला जो व्यापक स्वरूपाचा अविष्कार करावयाचा असतो तो साधला जाईलच असे नाही.

लेखकाची निर्मिती ही अभिव्यक्ती असते. ती एक प्रकारे संस्कृति टीका असते. आसपासच्या समाजात, भोवताली जीवन जगणाऱ्या लोकांच्या जगतात काय चालले याचे अवलोकन करून लेखक ते प्रमाणिकपणे शब्दांतून मांडण्याचा, व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. अनेकवेळा वास्तवतेच्या स्वरूपातून समाजातील अशिष्ट, ग्राम्य स्वरूपाचे चित्रणही त्यातून येते. पण ती त्या लेखकाची प्रामाणिक स्वरूपाची निर्मिती असते. अशावेळी लेखकाला कितपत स्वातंत्र्य असावे असा प्रश्न निर्माण होतो. क्षीरसागर श्री.के.[१९] याबाबत म्हणतात, "कोणी त्याला नीतीपाठाचा सोवळा प्रचारक बनवू पाहतात, कोणी नव्या संप्रदायाचा उतावीळ अनुचर बनवू पाहतात, तर कोणी नव्या राजवटीचा हुकमी भाट बनवू पाहतात. "लेखकाकडे अशा विशिष्ट स्वरूपातून पाहिले असता त्याच्या कलात्मक निर्मितीवर आपोआपच मर्यादा पडतात. त्याने बोधवादीच लिहावे, आनंददायीच चित्रण करावे असेही म्हटले जाते. आज जी अस्तित्त्ववादाची निर्मिती झाली ती स्वातंत्र्याच्या अभिव्यक्तीच्या ध्यासाने. कलेला स्वातंत्र्य असावे अशा मताचे प्रतिपादन करणारे वा.म. जोशी[२०] म्हणतात, "साहित्य कलेला स्वातंत्र्य असावे, तिला पायबंद कोणी घालू नये. ........ जराजर्जर रूढीचा, निर्दय नीतिचा किंवा कल्पनाशून्य सत्यप्रीतीचा तिला सासुरवास नसावा." जोशींनी कलेच्या स्वतंत्र निर्मितीचा अशाप्रकारे पाठपुरावा केलेला आहे. अस्तित्त्ववादी लेखक कलावंताचे स्वातंत्र्य म्हणून व्यक्तिस्वातंत्र्याचा पाठपुरावा करतात.

तात्पर्य, समाज व साहित्याचा विचार करताना सामाजिक जीवनाशी संबंधित असणाऱ्या विविध विचारांचा परामर्श घेतला जातो. सत्य नीती-प्रचारकीपणा-सामाजिक बांधिलकी या बरोबरच एक व्यक्ती म्हणून लेखकाचे

असलेले वेगळेपण त्याचे लेखन स्वातंत्र्य अशा सर्वच बाबू विचारात घ्याव्या लागतात. विशेषत: अर्वाचीन वाङ्.मयाचा विचार करताना तर अशा गोष्टींना अधिक महत्त्व येते. कारण अर्वाचीन वाङ्.मयातून अधिक स्पष्टपणा, रोकठोकपणे जीवनाचे वास्तवदर्शी स्वरूप प्रकट झालेले आढळते. समाजात कलेबद्दल जशी चर्चा होऊ लागली तशी कलेतील अभिव्यक्ती अथवा आशया-बद्दलची उलट-सुलट मते निर्माण होऊ लागली. वाङ्.मयकृतीही यातून बाजूला नाही. कलेच्या हेतू पासून अपेक्षोपर्यंत अशी मते मांडलेली आढळतात. आधुनिक काळात समाजजीवन अधिक घाईचे किंबहुना औद्योगिक प्रगतीमुळे वेगवान बनले आहे. त्यामुळे अशा बदलत्या समाजाचे तितकेच बदलते स्वरूपही साहित्यातून अभिव्यक्त झालेले आढळते. सामाजिक परिवर्तन व त्यानुरोधाने येणारे साहित्यिक लेखनातील परिवर्तन हे निश्चितच बदलत्या जीवनाचे स्वरूप आपणापुढे ठेवतात. त्यामुळे अशा परिवर्तनशील अवस्थेत समाज व साहित्य यांच्या संबंधाबाबत निश्चित मते मांडता येतील असे नाही.

१०) प्राचीन साहित्य व समाजजीवन:

समाज व अर्वाचीन साहित्य याप्रमाणे प्राचीन साहित्य व समाज यातील स्वरूप व संबंध तपासणेही साहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. गतकालीन समाजजीवन, त्यांच्या धर्मश्रध्दा, जीवनश्रध्दा, अशा विविध बाजू प्राचीन वाङ्.मयातून अभ्यासता येतात. मराठीत प्राचीन वाङ्.मयाचा अभ्यास झाला तो केवळ धर्मश्रध्दा व संप्रदाय समोर ठेवून त्यामुळे या साहित्यातून उमटलेले जीवनाचे व पर्यायाने समाजाचे चित्र दुर्लक्षितच राहिले. अलीकडच्या वाङ्.मयातून जसे सामाजिकतेचे स्वरूप आपणापुढे उभे राहते तसेच गतकालीन समाज जीवनाचे स्वरूप प्राचीन वाङ्.मयातून उभे राहते.

वाङ्.मयाच्या अभ्यासात मनोरंजन, आनंदमयता, सत्यता, नैतिकता, मनोरंजन यांचा विचार करतानाच त्यातील सामाजिकतेचाही मागोवा घेणे

युक्त ठरते. मानवी जीवन, माणसांचे संबंध - नाती- गोती अशा विविध स्वरूपाचे स्पष्टीकरण होणेही गरजेचे व महत्त्वाचे असते. एखाद्या विशिष्ट काळात व परिस्थितीत मानवी समाजाचे जीवनमान कसे होते ? ते कसे बदलत गेले ? जगण्या - वागण्याचे संकेत काय होते ? याचेही स्वरूप अभ्यासणे आवश्यक ठरते. काळाचा आणि वाङ्.मयाचा अन्योन्य संबंध अतिशय दृढ असतो. आणि वाङ्.मयाच्या विकासाचा क्रम सिध्द करणे ही वाङ्.मयेतिहासाची सर्वात मोठी जबाबदारी असते. अशा व्यापक स्वरूपातून साहित्याच्या अभ्यासाचे स्वरूप पाहणे अनिवार्य ठरते. लेखकाच्या, अथवा कवीच्या प्रतिभेचा आणि कल्पनाशक्तीचा स्वैर विलास एवढेच साहित्यकृतीचे मर्यादित स्वरूप नसते, तर तत्कालीन समाज जीवनाचे आणि वृत्ती-प्रवृत्तींचे प्रतिबिंब त्या साहित्यकृतीत कसे उमटलेले असते. हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे ठरते.

विशेषत: प्राचीन साहित्याचा अभ्यास करतांना ही विचारसरणी स्विकारणे गरजेचे आहे. आपल्याकडे प्राचीन वाङ्.मयाकडे धर्मभावनेने व धार्मिक दृष्टीकोनातुन पाहिले जाते. त्याच दृष्टीने त्यातील सर्व चित्रणाचा विचार केला जातो. साहित्यिक कलाकृती म्हणून या वाङ्.मयाचा अभ्यास होणे आगत्याचे आहे. काही प्रमाणात अशा स्वरूपातुन या वाङ्.मयाचा विचार केला जात आहे. तरी पण तो सांप्रदायिकतेच्या पातळीवरच अभ्यास केला गेला. त्यामुळे नकळतपणे या वाङ्.मयाच्या वस्तुनिष्ठ अवलोकनाला मर्यादा पडलेल्या दिसतात. वाङ्.मयाच्या अभ्यासात नेहमीच संकुचित विचारामुळे काही मर्यादा निर्माण होतात. त्यामुळे ठराविक वाङ्.मयीन कृतीचाच अभ्यास होतो व चांगले असलेले, आशयाच्या दृष्टीने प्रभावी असलेले, निवेदन, मांडणी व शब्द-वैभवाने परिपूर्ण असलेले वाङ्.मय बाजूला पडते. महानुभावीय साहित्य वरील सर्वच गुणधर्मांनी परिपूर्ण असूनही त्याचा सूक्ष्मतेने अभ्यास व्हावा म्हणून येथे दोन ग्रंथ निवडून त्यांचा सांगोपांग विवेचन केले आहे.

सामाजिक जाणिवांच्या आधारे "स्मृतिस्थळ" व "दृष्टांतपाठ" या दोन महानुभावीय ग्रंथांचा अभ्यास पुढील प्रकरणातून केलेला आहे.

...........

## प्रकरण दुसरे

## साहित्य व समाज: परस्परसंबंध

### सं द र्भ सू ची


१) मालशे स.ग. (भाषा) "साहित्य सिध्दांत" आ. १ली, पृ. ९२.

२) गाडगीळ गंगाधर "हाडक आणि पाणी" आ. २री, पृ. ५३.

३) गाडगीळ गंगाधर उ.नि. पृ. ५१.

४) कुलकर्णी गो.म. " मराठी साहित्यातील स्पंदने" आ. १ली, पृ. ७,८.

५) कुलकर्णी गो.म. उ. नि. पृष्ठ ९.

६) गांगल बाळ "सोबत" मधील लेख

७) डॉ. पाटणकर रा.भा. सौंदर्यमीमांसा, आ. २री, पृ. ३१०.

८) डॉ. वाळिंबे रा.शं. "साहित्यातील संप्रदाय" आ. ३री, पृ. २७३.

९) डॉ. वाळिंबे रा.शं. साजित्यातील संप्रदाय आ. ३री, पृ. २८५

१०) गाडगीळ गंगाधर उ.नि. पृ. ५५.

११) कुलकर्णी गो.म. "साद-पडसाद" आ. १ली, पृ. १८०.

१२) डॉ. पाटणकर रा.भा. "सौंदर्यमीमांसा" आ. २री, पृ. १७१.

१३) डॉ. जोग वि.स. "मार्क्सवाद आणि मराठी साहित्य" आ. १ली, पृ. ३३.

१४) डॉ. जोग वि.स. उ.नि. पृ. २९, ३०.

१५) डॉ. पाटणकर रा.भा. उ. नि. पृ. १७८.

१६) जोशी वा.म. "साहित्य-कौमुदी" आ. १ली, पृ. ११९.

१७) डॉ. पाटणकर रा.भा. उ. नि. पृ. ३१०.

१८) टवळे वि.ना. "साहित्याचे तत्त्वज्ञान" आ. १ली, पृ. १४४.

१९) क्षीरसागर श्री.के. "साहित्य-कौमुदी" आ. १ली, (कला आणि स्वातंत्र्य) पृ. १२४.

२०) जोशी वा.म. "साहित्य-कौमुदी" आ. १ली, वाङ्मय कलाविषयक माझी दृष्टी, पृ. ११९, १२०.


.....

A
10585